# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्याचे स्वतंत्र ड्रोन धोरण आखण्याबाबत

**(१) ४५७१२ (२१-०९-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ड्रोन व्यवसायाची उलाढाल सन २०२६ पर्यंत १५ हजार कोटींच्या घरात जाण्याचा तसेच येणाऱ्या काही वर्षात देशात एक लाख ड्रोन पायलट्स ची गरज भासणार असल्याचा अंदाज केंद्र सरकारने माहे मे २०२२ वा त्यादरम्यान व्यक्त केल्याचे निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ड्रोन व्यवसायातील वाढत्या रोजगार संधी बघता राज्याचे स्वतंत्र ड्रोन धोरण राज्य शासनाने आखले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन उद्योग आणि कौशल्य विकास विभागाच्या समन्वयाने ड्रोन संदर्भातील प्रशिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी किंवा सर्टिफिकेट कोर्स उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (११-०७-२०२३) :** (१) होय

(२) महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण आणि त्याअंतर्गत फॅब प्रकल्पाकरीता प्रोत्साहने व महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण जाहीर केले आहे. तसेच उद्योग विभागामार्फत महाराष्ट्र राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ यांस मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक ३०/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. ड्रोन हा घटक उदयोन्मुख तंत्रज्ञान मध्ये मोडत असून, सदर धोरणांतर्गत ड्रोन उद्योगास आकर्षक सुविधा व सवलती देवू केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, व्याज अनुदान, वीज दर अनुदान, मुद्रांक शुल्क सवलत, विद्युत शुल्क माफी इत्यादी स्वरुपात आर्थिक प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

(३) कौशल्य व कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, डी.जी.टी. नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक ३०/०३/२०२२ च्या पत्रान्वये ड्रोन अभ्यासक्रम औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सुरु करण्याबाबत निर्देश दिले आहेत. ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना २.० पेक्षा जास्त ग्रेड प्राप्त झाली आहे तसेच ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ड्रोन अभ्यासक्रमासाठीची यंत्रसामुग्री व उपकरणे आहेत अशा संस्थांमध्ये आधीपासून सुरु असलेल्या व्यवसाय उपक्रमांमधील यंत्रसामुग्री व उपकरणे यांचे Mapping करुन सदर संस्थामध्ये ड्रोन व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणे शक्य आहे अशा १२ संस्थांची नावे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत केंद्र शासनास कळविण्यात आली आहेत.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दिनांक १७/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था घनसावंगी, जि. जालना येथे ड्रोन पायलट या व्यवसाय अभ्यासक्रमाची ०१ तुकडी सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच दिनांक १७/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये शासकीय प्रशिक्षण संस्था जालना, जि-जालना येथे ड्रोन टेक्निशियन या अभ्यासक्रमाची ०१ तुकडी सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परिषद यांचेकडून ड्रोन व्यवसायाच्या अल्पमुदतीचे अभ्यासक्रम व्यवसायिक प्रशिक्षण संस्थामार्फत राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता समुपदेशन प्रक्रिया राबविणेबाबत**

**(२) ४७०३४ (१७-०९-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एकसारखी प्रवेश अथवा समुपदेशन प्रक्रिया राबविण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत असून याबाबत मा. उच्च न्यायालयने देखील निर्णय घेण्यासाठी शासनास निर्देश दिले असल्याचे माहे मे, २०२२ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे ,हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एकसारखी प्रवेश अथवा समुपदेशन प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे एक खिडकी योजनेद्वारे अभ्यासक्रमनिहाय केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. याकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास प्रत्येक विभागाच्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियांची अंतिम दिनांक ही संबंधित अभ्यासक्रमांच्या शिखर परिषदेमार्फत ठरवून देण्यात येते. त्यानुसार अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संबंधित अभ्यासक्रमांच्या शिखर परिषदेने ठरवून दिलेल्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकापर्यंत राबविली जाते.

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एकसारखी प्रवेश अथवा समुपदेशन प्रक्रिया राबविण्याची मागणी करण्यात आली असून त्याबाबत सदर मागण्यांतील व्यवहार्यता तपासण्याकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या स्तरावर तज्ञांची समिती नियुक्त करुन अहवाल सादर करण्याबाबत शासनाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत विकास कामांसाठी वाटप करण्यात आलेल्या निधीमध्ये तफावत असल्याबाबत**

**(३) ४८७५३ (२३-०९-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निधी वाटप करतांना उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात असमतोल झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबद जिल्ह्यात ५०५४ ०३ राज्यमार्ग, ५०५४ ०४ प्रजिमा नाबार्ड, केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत मागील ३ वर्षाच्या मंजूर कामाचा गोषवारा पहिला असता जिल्ह्यात ४७८.३३ कोटी रुपयांच्या मंजूर निधीपैकी फक्त ७.६८% निधी हा तुळजापूर मतदार संघास देण्यात आला असून सत्तेतील आमदार असलेल्या इतर ३ मतदार संघास १९.८५%, ३०.७३% व ४१.८१% निधी वितरीत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उस्मानाबद जिल्ह्यामध्ये ८ तालुके व ४ विधानसभा मतदार संघ असून येथील विकास कामाबाबत वाटप करण्यात आलेल्या निधीचा तपशील पाहता यामध्ये मोठी तफावत व असमतोल असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने असमतोलता दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना राबविल्या आहेत,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१६-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) उस्मानाबाद जिल्हयातील चार विधानसभा मतदार संघाची सन २०२०-२१ ते २०२२-२३ या आर्थिक वर्षात देण्यात आलेल्या सर्व लेखाशिर्षांतर्गत एकूण मंजूर निधी व वितरीत निधीची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे :-

| मतदारसंघ | ३ वर्षात मंजूर निधी | ३ वर्षात वितरीत निधी |
|---|---|---|
| उमरगा | ३१.०५ % | ३३.८७% |
| तुळजापूर | १२.९७% | १३% |
| उस्मानाबाद | १७.०८% | २१.२५% |
| परांडा-भूम | ३८.९०% | ३१.८८% |

(३) उस्मानाबाद जिल्हयातील या चार मतदार संघामधील कामे प्राधान्यक्रम, निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात आलेली आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सर्व शाळांमध्ये क्रीडा तास सक्तीचा करण्याबाबत

**(४) ४९६४८ (१८-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व शाळांमध्ये क्रीडा तास सक्तीचा करण्याबाबत योजना शासनाच्या विचारधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाकडून प्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाचा तपशील आणि अंमलबजावणीच्या/मान्यतेच्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे परिपत्रक दिनांक ०५.१०.२०१७ नुसार आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयासाठी सर्व शाळांमध्ये तासिकांची नियोजनानुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सहकारी सूतगिरण्या आणि यंत्रमाग पूर्ण क्षमतेने सुरु राहण्यासाठी नवे वस्त्रोद्योग धोरण तयार करण्याबाबत

**(५) ४९८६३ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अडचणींत असलेल्या सहकारी सूतगिरण्या आणि यंत्रमाग पूर्ण क्षमतेने सुरु राहण्यासाठी नवे वस्त्रोद्योग धोरण तयार करण्यासाठी वस्त्रोद्योग विभाग आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी वस्त्रोद्योग मंत्री, वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव तसेच वस्त्रोद्योग आयुक्त यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच आर्थिक अडचणींत सापडलेल्या सूतगिरण्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१७-०७-२०२३) :** (१), (२) व (३) वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ चा कालावधी दिनांक ३१.०३.२०२३ रोजीपर्यंत होता. नवीन वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ करीता शिफारशी शासन निर्णय दि. १६/११/२०२२ अन्वये आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी बैठका होऊन आयुक्त (वस्त्रोद्योग), यांनी शासनास वस्त्रोद्योग धोरणाचा मसूदा सादर केला.

अडचणीत सापडलेल्या सूतगिरण्यांना सहाय्य करण्यासाठी शासकीय भागभांडवल योजना, वीज सवलत, व्याज अनुदान योजना इ. योजना राबविण्यात येत आहेत.

तसेच नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत महाटेक्नोलॉजी अपग्रेडेशन फंड योजना, सौर ऊर्जा उभारणीसाठी भांडवली अनुदान स्वरुपात मदत इ. योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

---

## राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(६) ४९९०९ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगटाची स्थापना केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी कार्यगटाने अहवाल सादर केलेला आहे काय, अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२८-०६-२०२३) :** (१), (२) व (३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/ प्र.क्र. ४३/ विशि-३ दिनांक २०.०९.२०२२ अन्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगटाची स्थापना करण्यात आली आहे. सदर कार्यगटाचे कार्य हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी एक सक्षम यंत्रणा म्हणून कार्य करणे, डॉ. माशेलकर समितीने केलेल्या शिफारशींनुसार स्थापन करण्यात आलेल्या समित्यांच्या कामकाजाचा वेळोवळी आढावा घेऊन मार्गदर्शन करणे तसेच या विषय समित्यांनी दिलेल्या अहवालातील शिफारशींनुसार विभागामार्फत करण्यात आलेल्या/ करण्यात येणा-या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेणे असे आहे.

डॉ. माशेलकर समितीने केलेल्या शिफारशींनुसार स्थापन करण्यात आलेल्या समित्यांपैकी ४ समित्यांनी दिलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत सर्व अकृषि विद्यापीठांना कळविण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक ६.१२.२०२२ अन्वये सर्व विद्यापीठांना उपरोक्त अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीचे निदेश देण्यात आले आहेत. शासन निर्णय, दिनांक २६.१२.२०२२ अन्वये डॉ. करमळकर यांचे अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली असून त्यांनी केलेल्या शिफारशींनुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम आराखडा व श्रेयांक आराखड्यासंदर्भात शासन निर्णय दिनांक २०.०४.२०२३ व दिनांक १६.०५.२०२३ अन्वये निर्देश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा गृहपाठ बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(७) ५०२९७ (१८-०१-२०२३). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगामी शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचे ओझे कमी करुन पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा शालेय गृहपाठ बंद करण्याबाबत शासन विचार करीत असल्याचे जाहीर विधान शालेय शिक्षण मंत्री यांनी पुणे येथील महा.राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या एका शासकीय कार्यक्रमात केले असल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होत नसल्याने त्यांची शैक्षणिक गुणवत्ता कळत नाही त्यासाठी इयत्ता तिसरी ते आठवीच्या परीक्षा जुन्या पध्दतीने सुरु करण्याचा व शाळांच्या वेळात बदल करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन असल्याचेही शिक्षण मंत्री यांनी त्याच कार्यक्रमात व्यक्तव्य केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत राज्यातील शिक्षक संघटना, संस्थाचालक व शिक्षण तज्ञांशी चर्चा करुन अंतिम निर्णय घेतला जाईल असेही मा.मंत्री महोदयांनी सुचित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०७-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) दप्तराचे ओझे कमी करण्याच्या उद्देशाने इयत्ता २ री ते इयत्ता ८ वी च्या पाठ्यपुस्तकांमध्ये वह्यांची पाने समाविष्ट करण्यबाबतचा निर्णय दिनांक ०८ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या शिफारशी व PARAKH या संस्थेच्या मार्गदर्शक सूचना, नव्याने तयार होणारा अभ्यासक्रम यावर आधारित समिती स्थापन करून तसेच शिक्षक संघटना, संस्थाचालक व शिक्षण तज्ञ यांच्याशी चर्चा करून अंतिम निर्णय विद्यार्थी हित व शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत

**(८) ५३४६२ (१८-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संबंधी शालेय शिक्षण विभागाने शासन आदेश काढला असल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात निरक्षरांची संख्या मोठी असून विशेषतः १५ ते ३५ वयोगटातील निराक्षरांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात नवभारत साक्षरता अभियानाला सुरुवात होण्याबाबत तसेच याकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०७-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या पूर्व तयारीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही जसे कि सर्वेक्षण, शिकणाऱ्यांची ओळख, एकत्रिकरण इत्यादी क्षेत्रिय स्तरावरुन तात्काळ सुरु करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. सदर कार्यक्रमासाठी सन २०२२ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीव्दारे निधी मंजूर करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शिक्षकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(९) ५४६७१ (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :**सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यातील शिक्षकांचे वेतन दिवाळीपूर्वी करण्याचा निर्णय घेऊनही केवळ आठ जिल्हयातील शिक्षकांना तुटपुंजे वेतन मिळाले असून तब्बल २६ जिल्हयातील शिक्षकांना वेतनच मिळाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०७-२०२३) :** (१) होय
(२) व (३) वित्त विभागाने दिवाळी सणासाठी वितरीत केलेले अनुदान विभागाने आयुक्त (शिक्षण) कार्यालयाला वितरीत केले आहे. "वितरीत केलेले अनुदान केवळ नियमित वेतनासाठी असून यामधून अन्य कोणतेही देयके या अनुदानातून अदा करण्यात येऊ नये" असे स्पष्ट निर्देश संचालनालयाने दिले असतांनाही काही जिल्ह्यामध्ये फेब्रुवारी, २०२२ चे थकीत वेतन, ७ व्या वेतन आयोगाचा १ ला, २ रा व ३ रा हप्ता, थकीत महागाई भत्ता व इतर थकीत देयके अदा करण्यात आली, त्यामुळे काही जिल्ह्यांमधील शिक्षकांचे दिवाळीपूर्वी वेतन होऊ शकले नाहीत. याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व) यांच्याकडून खुलाशे मागवून संबंधितांवर वित्तीय अनियमितता केल्याबाबत शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

### राज्यात बेकायदेशीर खाद्यान्न विक्री व भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१०) ५५०३६ (१८-०१-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जवळपास दहा लाखांहून अधिक बेकायदेशीर खाद्यान्न विक्रेते असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेकायदेशीर खाद्यान्न विक्रीमुळे आणि खाद्यान्नातील भेसळीचा जनतेच्या आरोग्यावर परिणाम होत असल्यामुळे शासनाने खाद्यान्न विक्री व भेसळीवर प्रतिबंध घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, बेकायदेशीर खाद्यान्न विक्री व भेसळ करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) अन्न पदार्थांची गुणवत्ता अबाधित राहावी याकरिता तसेच अन्न पदार्थांच्या भेसळीस आळा बसावा व नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ नये यासाठी भेसळयुक्त अन्न पदार्थांची विक्री थांबविण्याबाबत अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यभरात अन्न पदार्थ उत्पादक, वितरक, किरकोळ विक्रेते यांच्या नियमित तपासण्या करून नमुने घेण्याची

कार्यवाही निरंतर केली जाते. सणासुदीच्या काळात विशेष मोहिमा आखून नागरीकांना निर्भेळ व सकस मिठाई, दुध, खवा, मावा, खादयतेल इ. अन्न पदार्थ मिळावेत याची खबरदारी घेतली जाते.

अन्न व औषध प्रशासनातर्फे अन्न आस्थापनांच्या नियमित तपासणी वेळी अन्न सुरक्षा अधिकारी यांना आस्थापना विनापरवाना / विना नोंदणी अन्न व्यवसाय करीत असल्याचे आढळल्यास प्रशासनाच्या धोरणानुसार सदर आस्थापनेस विषयांकित कायद्यांतर्गत परवाना/नोंदणी घेण्यास उदयुक्त केले जाते.

अन्न सुरक्षा व मानके कायदयाबद्दल जनजागृती होण्याकरिता प्रशासनाद्वारे व अनेक स्वयंसेवी संघटनेद्वारे अन्न व्यवसायिकांसाठी व ग्राहकांसाठी कार्यशाळा व प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुटखा व भेसळ मुक्त गाव योजनेच्या प्रस्तावाबाबत

**(११) ५५४६५ (१८-०१-२०२३). डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुटखा मुक्त गाव व भेसळ मुक्त गाव या योजनेचा प्रस्ताव आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांनी माहे जुन, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अन्न सुरक्षा प्रणालीचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत राज्य शासनाने केंद्र शासनाच्या अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण समवेत केलेल्या सामंजस्य करारांतर्गत अन्न भेसळ प्रतिबंधक उपाययोजनांमध्ये जनजागृतीचा समावेश केला आहे. सदर जनजागृती मोहिमेअंतर्गत ग्रामीण भागात गाव, तालुका व जिल्हा व नागरी भागात प्रभाग, नगरपालिका/महानगरपालिका घटक विचारात घेवून विशेष योजना तयार करून, इतर शासकीय विभागांचा सहभाग अंतर्भूत करून, त्याप्रमाणे योजनेचे प्रारुप निश्चित करणे व जनजागृती करण्याबाबतच्या बाबी सदर प्रस्तावित योजनेत अंतर्भूत आहे.

(३) गुटखा मुक्त गाव व भेसळ मुक्त गाव या योजनेसंदर्भात सुरक्षित अन्न व स्वस्थ महाराष्ट्र अभियान राबविणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनेक महाविद्यालयांकडे नॅकचा दर्जा नसल्याबाबत

**(१२) ५६७०६ (२४-०४-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३ हजार ३४६ वरिष्ठ महाविद्यालयांपैकी सुमारे १ हजार ९८६ महाविद्यालयांकडे नॅकचा दर्जा नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयाने नॅकचे मुल्यांकन करणेबाबत वारंवार सुचना देऊनही बहुतांश महाविद्यालयांनी याकडे दुर्लक्ष केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाविद्यालयांनी पुर्नमुल्यांकन प्रक्रिया पुर्ण करुन नॅकचा अपेक्षित दर्जा प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे अन्यथा विद्यापीठाची संलग्नता न मिळणे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदान न मिळणे, विद्याशाखा अभ्यासक्रम तुकडया तसेच विषयांना मंजुरी न मिळणे अशा प्रकारच्या कारवाई होणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशाप्रकारे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करित असलेल्या राज्यातील महाविद्यालयांवर कठोर कारवाई करुन त्यांच्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाचे नियंत्रण ठेवण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१४-०७-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिनांक २५.०१.२०२३ च्या पत्रान्वये सर्व महाविद्यालयांनी दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन प्रारंभ टप्प्यातील संस्था नोंदणी करुन IIQA नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य असल्याचे नमूद करुन त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करीता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करण्याबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल अशा सूचना केल्या आहेत. तसेच, अद्यापपावेतो एकदाही नॅक मुल्यांकन न झालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये व सद्यस्थितीत नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन INACTIVE असलेल्या अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथमवर्ष प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत IIQA नॅक कार्यालयास सादर केले नसल्यास अशा महाविद्यालयांबाबत अधिनियमातील तरतूदीनुसार महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्याची कारवाई संबंधित विद्यापीठांनी करण्याच्या सूचना दिनांक २३ मे, २०२३ च्या पत्रान्वये केल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये शालेय पोषण आहारात अनियमितता झाल्याबाबत

**(१३) ५६७११ (२४-०४-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थ्यांना इयत्तेनुसार आहार मिळावा असे शासनाचे निर्देश असून त्यानुसार आहार तयार करण्यांत येत असल्याने शालेय पोषण आहारात गेल्या काही महिन्यांपासून, मुगाच्या डाळीची आमटी आणि चवळी, हरभरा व तुरडाळ हे खाद्यपदार्थ दिले जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही महिन्यापासून सदर खाद्यपदार्थांच्या ऐवजी वेगळा आहार मिळावा अशी विद्यार्थ्यांनी शासनाकडे मागणी केली असल्याचेही दिनांक ०३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आहारासाठी शासनाकडून निधी उपलब्ध केला जातो परंतु माहे जून, २०२२ रोजीपासून तेल, भाजीपाल्याचे पैसे शासनाकडून न आल्यामुळे मुख्याध्यापकांना स्वत:कडचे पैसे खर्च करावे लागत असल्याचे तसेच आचाऱ्याचे मानधन प्रलंबित असून पंचायत समितींकडून मानधन देण्यास विलंब होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१४-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत शासनाने निर्धारित केलेल्या पाककृतीनुसार मुगडाळ, तुरडाळ, मसुरडाळ, हरभरा, वाटाणा, मटकी, अख्खा मुग, चवळी, भाजीपाला इ.चा समावेश करुन पात्र विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ देण्यात येतो.
(२) सदरप्रमाणे निवेदन आढळून येत नाही. तथापि, प्रस्तुत योजनेंतर्गत सद्यस्थितीतील पाककृतीमध्ये सुधारणा सुचविण्यासाठी शासनाने दि.१५ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) प्रस्तुत योजनेंतर्गत माहे मार्च-२०२२ ते जानेवारी-२०२३ या कालावधीतील खाद्यतेलाचे अनुदान तसेच, माहे मार्च-२०२२ ते एप्रिल-२०२३ या कालावधीतील इंधन - भाजीपाला व पुरक आहारासाठीचे अनुदान शाळा स्तरावर वर्ग करण्यात आले आहे.

स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे माहे, मार्च-२०२३ अखेरपर्यंतचे मानधन शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या स्तरावरुन वितरीत करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-सातारा महामार्गावरील सेवा रस्ते आणि पुलांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१४) ५६७७३ (२४-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-सातारा महामार्गावरील मुख्य रस्त्यांवरील पुलांची तसेच सेवा रस्त्यांची कामे अद्याप अपूर्ण असल्याने वाहतूक संथगतीने होत असणे, वारंवार वाहतुकीची कोंडी होणे इ. प्रकार घडत असल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजीपर्यंत पुलं आणि सेवा रस्त्यांच्या प्रलंबित कामांचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रलंबित कामे पूर्ण होण्यास सुमारे किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२३) :** (१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अखत्यारीत येते.

सदर महामार्गाच्या सहापदरीकरण करणेच्या कामासाठी सवलत करारानुसार प्रकल्प पूर्ण करण्याची नियोजित तारीख माहे मार्च २०१३ होती.

जमीन हस्तांतरित करण्यास विलंब, सेवा वाहिन्या स्थलांतरण, महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे काढणे, धार्मिक स्थळांचे स्थलांतरण इ. कारणांमुळे सदर काम हे नियोजित कालावधीत पूर्ण करता आले नाही.

सद्यस्थितीत महामार्ग सुस्थितीत असून वेळोवेळी देखभाल दुरुस्ती केली जात असल्याने तसेच बहुतांशी कामे पुर्ण झाल्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या सुटलेली आहे.
(२) पुणे सातारा महामार्गाच्या एकूण १३७.६६ कि.मी. लांबीपैकी २.६९ कि.मी. लांबीमध्ये शिंदेवाडी, जि.सातारा , किकवी, ता.भोर, जि.पुणे, खेड शिवापूर, जि.पुणे या ठिकाणी स्थानिक लोकांनी मंजूर निविदेतील उड्डाणपूल/भूयारी मार्गाचे ठिकाण व रुंदी यामध्ये बदल करण्याची मागणी केली असल्याने या ठिकाणी कामे अपूर्ण आहेत.
(३) मुद्दा क्र.२ मध्ये नमुद प्रलंबित कामास मंजुरी मिळाली असून सद्यस्थितीत निविदा प्रक्रिया सुरु आहे.

---

## मिशन झिरो ड्रॉपआउट योजनेअंतर्गत पालघर जिल्ह्यातील शाळाबाह्य, अनियमित, व स्थलांतरीत मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहत आणण्याबाबत

**(१५) ५६८१२ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिशन झिरो ड्रॉपआउट योजनेअंतर्गत शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता दिनांक ५ जुलै ते दिनांक २० जुलै, २०२२ या १५ दिवसांच्या कालावधीत सर्वेक्षण करण्याच्या सूचना राज्य शासनाने सर्व जिल्ह्यांना दिनांक २३ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे दिल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील सदर मिशन झिरो ड्रॉपआउट योजनेच्या अंमलबजावणीबाबत तसेच त्याअनुषंगाने केलेल्या सविस्तर कारवाईबाबत एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने दिनांक २६ जुलै, २०२२ रोजी वा त्या सुमारास . शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा पालघर यांना सविस्तर निवेदन सादर केले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यात मिशन झिरो ड्रॉपआउट योजनेअंतर्गत शाळाबाह्य अनियमित व स्थलांतरीत मुलांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०७-२०२३) :** (१) होय. शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करण्यासाठी मिशन झिरो ड्रॉपआऊट दिनांक ०५ जुलै ते २० जुलै, २०२२ या कालावधीत व्यापक स्वरुपात राबविण्याबाबत दिनांक २३ जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले होते.

(२) होय.

(३) व (४) दिनांक २३.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन पालघर जिल्हयामध्ये शाळाबाह्य अनियमित व स्थलांतरीत मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करणेसाठी मिशन झिरो ड्रॉपआऊट ही मोहिम दिनांक ०५ ते २० जुलै, २०२२ या कालावधीत राबविण्यात आली. त्यानुषंगाने सर्व गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती यांच्याकडील प्राप्त अहवालानुसार सदर मोहिमेतंर्गत ६ ते १८ वयोगटातील एकूण १००६ शाळाबाह्य बालके आढळून आलेली आहेत. त्यापैकी ६ ते १४ वयोगटातील ३१५ शाळाबाह्य बालके असून ती सर्व बालके शाळेत दाखल करण्यात आलेली आहेत.

तसेच सदर शोध मोहिमेमध्ये १५ ते १८ वयोगटातील एकूण ६९१ शाळाबाह्य बालके असून त्यापैकी ६८९ बालकांना शाळेत दाखल करण्यात आलेले आहे. उर्वरित मोखाडा गटातील २ बालके कुटूंबासोबत ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यात स्थलांतरीत झालेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील नाशिक-निफाड-येवला रस्ता प्रमुख राज्य मार्ग क्र.२ व धाराशीव (उस्मानाबाद) जिल्हयातील रस्त्याच्या कामाला आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्प अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(१६) ५६९३४ (२५-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नाशिक-निफाड-येवला रस्ता प्रमुख राज्य मार्ग क्र.२ किमी १७९ ते २३५ व धाराशीव (उस्मानाबाद) जिल्हयातील अ. भातंब्रा-उस्मानाबाद-सारोळा -शिवली-बोरफळ रामा-६८ रस्ताकिमी २६१/६६० ते ३११/१६० (जिजाऊ चौक उस्मानाबाद ते बोरफळ राममा-३६१) (एकुण लांबी ४९.५०० कि.मी.), ब. कळंब-ढोकी-तेर-बेंबळी-तुळजापूर-अक्कलकोट रस्ता रामा-२०८ किमी ३४/०० ते ७६/४०० (भाग- तेर ते तुळजापुर) (एकुण लांबी ४२.४०० कि.मी.), क. राममा-३६१ ते काक्रंबा-होनाळा-वडगांव-सलगरा-किलज-होर्टी मुर्टा ते राममा-६५ जळकोट-हंगरगा-बोरगांव-सलगरा मड्डी-अचलेर-बेळंब-कोथळी-खसगी-डिग्गी ते राज्य सरहद्द रस्ता प्रजिमा-३७ किमी ०/०० ते ३२/४०० (भाग-

राममा-३६१ काक्रंबा ते राममा-६५ जळकोट) (एकुण लांबी ३२.४०० कि.मी.) या रस्त्यांना आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्प अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२, दिनांक २० डिसेंबर, २०२२ व दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची सुधारणा आशियाई विकास बँक (ADB) अंतर्गत झाल्यास दळण-वळणाची सोय उपलब्ध होऊन परिसरातील कृषि व इतर व्यवसायाला चालना मिळेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२३-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यातून हाती घेण्यात येणा-या प्रकल्पांबाबत विहीत केलेले निकष, निधीची उपलब्धता व प्राधान्यक्रम विचारात घेऊन प्रस्तुत काम हाती घेण्याचे नियोजन राहील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियानाच्या निर्देशानुसार राज्य शासनाने दहा वर्षांचा उच्च शिक्षण अभियानाचा धोरणात्मक आराखडाच तयार केला नसल्याबाबत

**(१७) ५६९४४ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय उच्च स्तर शिक्षा अभियानाच्या निर्देशानुसार पुढील दहा वर्षासाठी उच्च शिक्षण अभियानाचा धोरणात्मक निर्णय घेऊन आराखडा तयार करून घेतला जाणार होता हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य उच्च शिक्षण परिषद संस्था व्यापक, दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक उच्च शिक्षणाचा आराखडा विकसित करून केंद्र शासनाच्या `उच्च स्तर शिक्षा अभियान' व राज्य शासन यामधील समन्वय साधण्याचे कार्य करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील उच्च शिक्षणाविषयी काम करणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन करण्याची जबाबदारी राज्य उच्च शिक्षण परिषद या संस्थेला माहे डिसेंबर, २०१६ मध्ये देण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र शासनाने दहा वर्षांचा धोरणात्मक आराखडाच तयार केला नसल्यामुळे प्रशासनाच्या दिरंगाईमुळे राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण अभियानातून मिळणाऱ्या महत्त्वाच्या लाभांपासून वंचित रहावे लागणार असल्याचे लेखापरीक्षणाच्या अहवालातून निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२८-०६-२०२३) :** (१), (२) व (३)

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, अधिसूचना दिनांक २१.०८.२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान परिषद संदर्भातील यापुर्वीचे सर्व संलेखांचे अधिक्रमण करुन या परिषदेमध्ये नव्याने सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे.

भारत सरकारच्या रुसा मार्गदर्शक तत्वांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या १८ घटकानुसार राज्य उच्च शिक्षण आराखडा तयार करणे, राज्य उच्च शिक्षण आराखडा (एसएचईपी) आणि रुसा योजना यांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे आणि रुसा परिषदेअंतर्गत विकसित करण्यात आलेली मानके व प्रमूख कामगिरी निर्देशक यांच्या आधारे राज्यातील उच्च शिक्षण परिसंस्थांचे मुल्यमापन करणे अशी महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान परिषदेची कार्ये सदर अधिसूचनेमध्ये नमूद केलेली आहेत.

(४) हे अंशतः खरे आहे.

दि.३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवालामध्ये महालेखापालांनी राज्य उच्च शिक्षण आराखडा तयार करण्यात विलंब याअंतर्गत राज्याकडून दहा वर्षांचा धोरणात्मक आराखडा तयार केला नव्हता असा आक्षेप नोंदविला आहे. वास्तविकतः रुसा अंतर्गत राज्य उच्च शिक्षण आराखडा (एसएचईपी) तयार करण्यात सावधगिरी बाळगली असून रुसा १.० आणि २.० हे दोन्ही ही प्रकल्प यशस्वीपणे राबवले आहेत. ही बाब मा. महालेखापालांना स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांद्वारे अवगत करण्यात आली आहे. तथापि, राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण अभियानातून मिळणाऱ्या महत्त्वाच्या लाभांपासून वंचित रहावे लागलेले नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येवला (जि.नाशिक) तालुक्यातील रस्त्याच्या कामांवरील स्थगिती उठवण्याबाबत

**(१८) ५७१६० (२५-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील अर्थसंकल्प २०२२ मधील रस्त्याच्या कामाची स्थगिती उठवून काम सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२ आणि दिनांक ८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने दि. २३ जुलै २०२२ च्या पत्रान्वये स्थगिती दिलेल्या कामांवरील स्थगिती उठविण्याकरिता लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाला निवेदन दिले असता शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर,२०२२ च्या पत्रान्वये ठराविक कामांवरीलच स्थगिती उठवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कामे पुर्ण होण्याची आवश्यकता असल्याने तसेच या कामाची निविदा प्रक्रिया माहे जुलै २०२२ मध्येच पूर्ण झाली असल्याने सर्व रस्त्याच्या कामांवरील स्थगिती उठविण्यासाठी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नाशिक यांनी सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक ६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील प्रस्तावाच्या अनुषंगाने कामांवरील स्थगिती उठवून कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१९-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर पत्रान्वये काही रस्त्यांच्या कामांवरील स्थगिती उठविण्यात आली आहे. हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांचे दि. ०६.१२.२०२२ च्या प्रस्तावात नमूद प्रजिमा-७५ उंदीरवाडी कोटमगाव नगरसूल कोळगाव ममदापूर ते प्रजिमा-७६, प्रजिमा-१६० रस्ता सुधारणा करणे किमी ०/०० ते ३/९००, ९/९०० ते १५/३०० व २०/३०० ते २५/७०० ता.येवला, जि.नाशिक या रस्त्यावरील स्थगिती उठविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानी दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात ३०% वाढ करण्याबाबत**

**(१९) ५७५७२ (२४-०४-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानी दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात ३० % वाढ करण्याचा प्रस्ताव राज्य शासनास पाठविला असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण मंडळास दहावी-बारावीचे परीक्षा शुल्क व उत्तरपत्रिकेच्या माध्यमातून १८० कोटींचे उत्पन्न मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण मंडळाला आस्थापना खर्चासह कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन, यासह विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधा, परीक्षकांचे मानधन, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन आदीचा खर्च करण्याकरीता ४० ते ५० कोटींचा तोटा सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी दिल्यास आर्थिकदृष्टया कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरणे जड जाणार आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिक्षण मंडळाचा तोटा भरुन काढण्याकरीता व आर्थिकदृष्टया कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांवर परीक्षा शुल्काचा पडणारा अतिरिक्त बोजा टाळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०७-२०२३) :**(१) होय.

(२) राज्य मंडळाला परीक्षा शुल्क व अन्य माध्यमातून वार्षिक सर्वसाधारणत: १६० कोटी उत्पन्न मिळते.

(३) होय.

(४) सदर विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती मिळत असल्याने परीक्षा शुल्क भरणे जड जाणार नाही.

(५) सन २०२२-२३ च्या परीक्षांपासून इ.१० वी व इ.१२ वी च्या परीक्षांसाठी परीक्षा शुल्कात १०% वाढ करण्यास तसेच पुढील तीन वर्षे प्रत्येकी १०% वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कौडगाव (ता.जि. धारशिव ,उस्मानाबाद) येथील एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात टेक्निकल टेक्स्टाईल इंडस्ट्रियल हब सुरू करणेबाबत**

**(२०) ५८०८४ (२४-०४-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौडगाव, धारशिव (उस्मानाबाद) येथील एम.आय.डी.सी. औद्योगिक क्षेत्रामध्ये टेक्निकल टेक्स्टाईल हब सुरू करण्याची मागणी लोकप्रतिनिधीद्वारे दिनांक १७ ऑगस्ट,२०२२ व दिनांक १० नोव्हेंबर,२०२२ व तत्पूर्वी वारंवार शासनाकडे करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने के.पी.एम.जी. या बहुराष्ट्रीय कन्सल्टन्सी फर्मच्या माध्यमातून प्राथमिक अहवाल तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू टेक्निकल टेक्स्टाईल इंडस्ट्रियल हब सुरू करण्याबाबत मा.उद्योग मंत्री यांच्या समावेत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच सर्व संबंधित अधिकारी यांची बैठक दिनांक ११ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कौडगाव, धारशिव (उस्मानाबाद) येथे टेक्निकल टेक्स्टाईल इंडस्ट्रियल हब सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०७-२०२३) :** (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.

(४) कौडगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. १ साठी १७३.७४ हे. आर व कौडगांव औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ३ साठी ३७३.३१ हे. आर असे एकुण ५४७.०५ हे. आर क्षेत्र मऔवि महामंडळामार्फत संपादित करण्यात आलेले आहे.मऔवि महामंडळामार्फत सचिव, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली यांना पत्र क्र. डी-०९१६३ दि. १५/०९/२०२२ अन्वये धाराशिव येथे टेक्निकल टेक्सटाईल पार्कच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे व के. पी. एम. जी. या संस्थेमार्फत तयार केलेला प्राथमिक प्रकल्प अहवाल सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. सदर प्रस्तावास वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर धाराशिव येथे टेक्निकल टेक्सटाईल पार्क स्थापन करणेकामी तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यतेबाबत सविस्तर अहवाल (Detailed Report on Techno-Economic Feasibility) तयार करण्याची तजवीज मऔवि महामंडळामार्फत ठेवण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील विविध उद्योगात स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबत

**(२१) ५८३२८ (२४-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील विविध उद्योगात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (११-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही. जिल्हयातील मोठे उद्योजकांकडून स्थानिक लोकांना रोजगार संबंधीत ELP-१ (Employment Local Person-१) विहीत नमुना सादर करण्यांत येत असून सदर अहवालानुसार सर्व मोठे उद्योग घटकामध्ये ८०% चे वर म्हणजेच ९०.३६% रोजगार स्थानिक लोकांना उपलब्ध करून दिला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथील दुरावस्थेत असलेल्या ठाणे-घोडबंदर राज्यमार्ग क्र.८४ रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(२२) ५८६१४ (२५-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील ठाणे-घोडबंदर (जि.ठाणे) राज्यमार्ग क्र.८४ या वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या रस्त्याची दूरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात पाठपुरावा करण्यात आला आहे काय तसेच त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सदर रस्त्यावर ४.४ कि.मी. लांबीमध्ये घाटमार्गाची भौमित्तिक सुधारणा करणेचे रक्कम रु.९५० लक्षचे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन काम कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

सदर रस्त्यावर कासारवडवली जंक्शनची सुधारणा करणे तसेच एका मार्गिकेचे काँक्रीटीकरण करणे व संलग्न कामाचे रक्कम रु.५०० लक्षचे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन काम कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

सदर रस्त्यावर वार्षिक दुरुस्ती व देखभाल कार्यक्रमांतर्गत दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे वेळोवळी करुन रस्ता वाहतुकीकरीता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात आदिवासी नव उद्योजकांसाठी उद्योग उभारण्यासाठी नवीन संधी उपलब्ध होत नसल्याबाबत

**(२३) ५८७७३ (२४-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी समुदायाची एकूण लोकसंख्या १.१२ कोटी असून हे प्रमाण एकूण लोकसंखेच्या ९.३५ % असल्याने आदिवासी समाजातील उद्योजक तरुणांना उद्योग उभारणीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांच्या मार्फत कोणतीही योजना आणि कार्यक्रम राबवले जात नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औद्योगिक धोरण २०१९ नुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नवीन औद्योगिक वसाहतीमध्ये २० टक्के क्षेत्रफळ हे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती मधील उद्योजकांसाठी राखीव ठेवण्याबाबत धोरण असूनही आदिवासी नव उद्योजकांना अत्यंत अल्प प्रमाणात भूखंड वाटप केले जात नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी समाजातून उद्योजक आणि व्यावसायिक निर्माण होण्यास अडचणी होत आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण २०१९ नुसार नवीन औद्योगिक क्षेत्राचा आराखडा तयार करताना, ज्या औद्योगिक क्षेत्राचे क्षेत्र २०० हेक्टर व त्यापेक्षा जास्त आहे, अशा औद्योगिक क्षेत्रात २० टक्के सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी (MSME) राखीव ठेवण्याबाबत तसेच २०० हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र असलेल्या औद्योगिक क्षेत्रात १० टक्के क्षेत्र सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी (MSME) राखीव ठेवण्याचे धोरण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्वीकारले आहे.

त्यानुसार राखीव क्षेत्रापैकी २० टक्के क्षेत्र अजा/ अज (SC/ST) करीता राखीव ठेवणेबाबत महामंडळाच्या दि. २०/८/२०१९ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे.
(२), (३) व (४ हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात अजा/ अज (SC/ ST) करीता ५८१ भूखंड (५३.२३ हेक्टर क्षेत्र) राखीव ठेवण्यात आले असून, त्यापैकी १३६ (८.९९ हेक्टर क्षेत्र) भूखंडाचे विविध अजा/ अज (SC/ ST) उद्योजकांना वाटप करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत अजा/ अज (SC/ ST) करीता राखीव भूखंडांपैकी ४४५ भूखंड (४४.२४ हेक्टर क्षेत्र) वाटपास उपलब्ध असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे एकही अर्ज प्रलंबित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भिवंडी शहरातील शिधावाटप कार्यालय फ-३७ मध्ये झालेला गैरव्यवहार

**(२४) ५८८४३ (२४-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरात शिधावाटप कार्यालय फ-३७ मधील रेशनिंग निरीक्षक श्री.योगेश धमाळ हे सदर कार्यालयात ६ वर्षापासून कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रेशनिंग निरीक्षक आर्थिक देवाणघेवाण केल्याशिवाय कोणतेही कामकाज करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन प्रशासनामार्फत त्यांची बदली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१८-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
संबंधित शिधावाटप निरीक्षक (त) हे शिधावाटप कार्यालय फ-३७ भिवंडी येथे ३ वर्ष ११ महिने कार्यरत होते.

(२) हे खरे नाही

(३) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे

(४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या दि. १०.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये संबंधित शिधावाटप निरीक्षक यांची शि.का.क्र. १७-अ धारावी कार्यालयात शिधावाटप निरीक्षक (प्र) या अकार्यकारी पदावर बदली करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

### भिवंडीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाची दुरवस्था झालेबाबत

**(२५) ५८८७१ (२४-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून भिवंडी नगरपरिषदेने १९९१ मध्ये भिवंडी मंडई येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाची स्थापना केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रंथालयाची इमारत धोकादायक झाल्यामुळे विद्यार्थी जीव मुठीत घेऊन ग्रंथालयात अभ्यास करीत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील दोन वर्षापासून ग्रंथपाल व सफाई कर्मचारी नसल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-०७-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) ग्रंथालयात आवश्यक असलेल्या कर्मचारीवर्गाची नियुक्ती करण्यात आली असून महानगरपालिकेमार्फत ग्रंथालयाची दैनंदिन सफाई करण्यात येते.

(४) व (५) सदर ग्रंथालयाच्या इमारतीस जवळपास ४६ वर्षे झाली असून शहर अभियंता यांच्या अहवालानुसार सदर इमारत धोकादायक असल्याचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असून स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यात येत आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडून सदर इमारतीच्या जागी प्रशस्त इमारत बांधण्याकरीता २०२२-२३ च्या दरसूचीनुसार सुधारीत

अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर इमारत नव्याने तयार होईपर्यंत पर्यायी व्यवस्था करुन ग्रंथालय दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**राष्ट्रीय शिक्षण धोरण अंमलबजावणीसाठी सुकाणू समिती स्थापन करणेबाबत**

**(२६) ५९०१७ (२४-०४-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या उपसमित्यांनी दिलेल्या अहवालाबाबत त्रुटी सोडविण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाचे माजी कुलगुरु श्री. करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ डिसेंबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास १४ जणांची सुकाणू समिती स्थापन केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीतर्फे नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणांची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२८-०६-२०२३) :** (१) व (२) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची राज्यातील अंमलबजावणी संदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी शासन निर्णय दि.२६.१२.२०२२ अन्वये श्री. करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती गठीत करण्यात आली आहे. सुकाणू समितीने केलेल्या शिफारसींनुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि श्रेयांक आराखड्याबाबत शासन निर्णय दि.२०.०४.२०२३ व दि.१६.०५.२०२३ अन्वये निर्देश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**व्यायामशाळांमध्ये उत्तेजनात्मक औषधे घेतल्यामुळे मृत्युंचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(२७) ५९०४० (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर सह राज्यात व्यायामशाळांमध्ये उत्तेजनात्मक औषधे घेतल्यामुळे मृत्युंचे प्रमाण वाढत असून विनापरवापना औषधांचा वापर करण्याऱ्या व्यायामशाळांची सुरु असलेली चौकशी पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार विनापरवापना औषधांचा वापर करण्याऱ्या व्यायामशाळांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१९-०७-२०२३) :** (१) व (२) विविध प्रसार माध्यमातून प्रसारित झालेल्या बातम्याच्या अनुषंगाने राज्यातील एकुण १५२ व्यायामशाळांची माहे डिसेंबर, २०२२ च्या सुमारास तपासण्या करण्यात आल्या आहेत. तपासणी दरम्यान कोणत्याही व्यायामशाळेत उत्तेजनात्मक औषधे साठविलेले किंवा सेवन करत असल्याचे आढळून आलेले नाही.

तथापि, शरीरसौष्ठवासाठी विनापरवाना Steroid Injection विक्री करण्यात येत असल्यामुळे मे. कोशेर फार्मा, बोरीवली, मुंबई या ठिकाणी छापा टाकून Steroid Injection चा साठा जप्त करण्यात आला होता. सदर प्रकरणात काही व्यक्तींचा सहभाग असल्याच्या संशयावरून एम. एच. बी. वसाहत पोलीस स्टेशन, बोरीवली (प.), मुंबई येथे भारतीय दंड संहितेच्या कलमानुसार गुन्हा क्र. ४३/२०२३, दिनांक २५.०१.२०२३ रोजी नोंदविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(२८) ५९०७० (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रस्तावाबाबत कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे;

(२) व (३) राज्यात डिजीटल विद्यापीठ स्थापन करण्यासाठी दिनांक ०९ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती नियुक्त करण्यात आली असून समितीने सादर केलेल्या अहवालासंदर्भातील पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात वस्त्रोद्योग धोरण समिती गठीत करण्याबाबत

**(२९) ५९२९८ (२४-०४-२०२३). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण सन २०२३ - २०२८ साठी प्रस्तावित समिती दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ रोजी गठीत केली केली असून राज्यात वस्त्रोद्योगामध्ये ५० टक्के वाटा भिवंडी (जि. ठाणे) तालुक्याचा असताना सदर समितीवर भिवंडी तालुक्यातील लोकप्रतिनिधी व यंत्रमाग प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०२२ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लोकप्रतिनिधी व यंत्रमाग प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे तसेच सदर समिती गठीत करण्यास किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१३-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ बाबत उपाययोजना प्रस्तावित करण्यासाठी शासन निर्णय दि. १६/११/२०२२ अन्वये समिती गठीत करण्यांत आली आहे. या समितीमध्ये भिवंडी येथील विधानसभा सदस्य श्री. रईस शेख, यंत्रमागधारकांचे प्रतिनिधी म्हणून श्री.शरद उध्दव मढवी , निर्णयान्वये श्री.पूनीत खेमसिया, श्री. राजेंद्र वासम यांचा समावेश करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिखली, खंडाळा (जि.बुलडाणा) येथील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने MIDC साठी संपादित केल्याबाबत

**(३०) ५९३०९ (२४-०४-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील चिखली आणि खंडाळा येथील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने MIDC साठी संपादित केलेल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाने जमिनी संपादित केल्यामुळे भूपिडीत झालेल्या शेतकऱ्यांना १०० चौ. मी. ते १५० चौ.मी पर्यंत आकाराचे भूखंड वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय दिनांक ३० जून,१९९४ रोजी वा त्या सुमारास घेतलेला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, चिखली एमआयडीसी अंतर्गत भुपिडीत नागरिकांनी त्यांना १९९४ च्या परिपत्रका नुसार भूखंडाची मागणी केलेली आहे. परंतू त्यांनी केलेले अर्ज मुदतीनंतर सादर केल्याने त्यांना अद्यापपावेतो भूखंड मिळालेले नाही हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, १९९४ च्या परिपत्रकाला मुदत वाढ देण्यासाठी विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अमरावती यांचे मार्फत शासनाकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर परिपत्रकास मुदत वाढ देऊन नागरिकांना भूखंड मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) अर्जदारांनी विहित मुदतीत भूखंड मागणीचा अर्ज सादर केलेला नाही. विहित मुदत वाढवून देण्याच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असून त्याप्रमाणे मुदतवाढीबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर (जि.जळगांव) येथे गोदाम उपलब्ध करुन न दिल्याने भरड धान्य खरेदी न झाल्याबाबत

**(३१) ६०६०८ (२१-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगांव) येथे आधारभूत किंमतीत होणारी भरड धान्य खरेदी अडचणीत आल्याने प्रशासनाने महिनाभर गोदाम उपलब्ध करुन न दिल्याने धान्य खरेदी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांनी शेतकी संघात खरीप हंगामातील मका व ज्वारी आधारभूत किंमतीत खरेदीकरिता नाव नोंदणी करुनही खरेदी सुरु न झाल्याने शेतकरी अडचणीत आला व प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१७-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापुर येथील शिवाजी विद्यापीठाच्या मागण्यांबाबत**

**(३२) ६०७३० (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठाच्या जुन्या पुणे बंगळूर महामार्गाच्या पुर्व-पश्चिम बाजु यांना जोडण्यासाठी भुयारी मार्गाची आवश्यकता असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर प्रलंबित असल्याचे दिनांक ०२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच, विद्यापीठ हवामान बदल, गुळ संशोधन आदि बाबत संशोधन करणेसाठी व इतर उपक्रम यांना मान्यता घेणेसाठी शासनाकडे सविस्तर अहवाल सादर करण्यात आला असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शिवाजी विद्यापीठाच्या प्रलंबित मागण्यांबाबत किंवा प्रस्तावांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१५-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही. शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरुपी जोडण्याकरीता भुयारी मार्ग व सर्विस रस्ता बांधण्याकरीताच्या कामास रु.८४८.८१ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास दि.१५.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) हवामान बदल संदर्भातील प्रस्ताव सादर केलेला नसून, कोल्हापूर शहरातील हवा प्रदूषण मापनाचे काम सुरु आहे. तसेच गुळ संशोधनासंदर्भातील प्रस्ताव आरजीएसटीसी, मुंबई या वित्तीय संस्थेस सादर केला होता. त्यानुसार निधी प्राप्त झालाअसून, गुळ संशोधनावर काम सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेनगांव (जि.हिंगोली) परिसरात निकृष्ट धान्याचे वाटप होत असल्याबाबत**

**(३३) ६०८३२ (२४-०४-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगांव (जि.हिंगोली) परिसरातील स्वस्त धान्य दुकानातील गहू व तांदुळ या मालाची पाहणी एका राजकीय नेत्याने केली असता त्यात किडे, अळया व भुंगे लागलेले गहू आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदामामधील माल सहा व सात महिन्यापासून वाटपाविना पडून राहिल्याने हे निकृष्ट धान्य मोफत धान्य म्हणून ग्राहकांना वाटप करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

ता.सेनगाव, जि.हिंगोली येथे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा शेवटच्या आठवड्यात रास्त भाव दुकानदार किंवा शिधापत्रिकाधारक यांचेकडून किडे, अळया व भुंगे लागलेले गहू वा तांदुळ खराब असल्याची

अशी कोणतीही लेखी तक्रार जिल्हा पुरवठा कार्यालय, हिंगोली येथे प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

FCI मार्फत आवश्यक असलेल्या धान्याची उचल व वितरण हे प्रत्येक महिन्यात करत असल्यामुळे तसेच धान्याची प्रतवारी करूनच धान्य वितरीत केले जाते. त्यामुळे गोदामामधील माल सहा ते सात महिन्यापासून वाटपा विना पडून राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही व हे धान्य रास्त भाव दुकानदार किंवा लाभार्थ्यांना वितरीत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील राज्याबाहेर गेलेल्या प्रकल्पाबाबत माजी न्यायमर्तीच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याबाबत**

**(३४) ६०९४१ (२५-०४-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :**सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठमोठे उद्योग उभारण्यात मागील अडीच वर्षात का येऊ शकले नाहीत व त्यामागची कारणे काय होती, यासंबंधीची श्वेतपत्रिका (white paper) १ महिन्यात प्रसिध्द करण्यात येईल असे उद्योग मंत्री महोदयांनी दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास आयोजित पत्रकार परिषदेत माध्यमांद्वारे सांगितले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याबाहेर गेलेल्या प्रकल्पाची चौकशी करण्यासाठी माजी न्यायमुर्तीच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचे व या समितीत दोन निवृत्त सनदी अधिकाऱ्यांचा समावेश असणारी समिती नेमण्याचे व ही समिती दोन महिन्यात (६० दिवसात) आपला अहवाल शासनास सादर करणार असल्याचेही उद्योग मंत्री महोदयांनी दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रकार परिषदेत माध्यमासमोर सांगितले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उद्योग मंत्रीनी जाहीर केलेली श्वेतपत्रिका १ महिन्यात प्रसिध्द करण्यात येणार असतांना माहे जानेवारी, २०२३ अखेरपर्यंत तरी श्वेतपत्रिका प्रसिध्द झाली नसल्याचेही तसेच मा.निवृत्त न्यायमूर्तीच्या अध्यक्षतेखाली समितीची अद्याप स्थापना करण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वाकरण्यात अथवा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०७-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

जून,२०२० पासून ते जून २०२३ पर्यंत सुमारे रु. ४ लाख १७ हजार ८०० कोटींपेक्षा अधिक रक्कमचे १४९ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आलेली आहे. त्यात ४ लाख ७ हजार ३२८ रुपयांच्या (ऑक्टोंबर २०१९ ते मार्च २०२३ ) थेट परकीय गुंतवणुकीचा समावेश असून त्यातून सुमार साडे पाच लाख रोजगार निर्मिती होणार आहे. सदर गुंतवणुकीमध्ये मुख्यत: वाहन व वाहन घटक, मेडिकल डिव्हायसेस, रासायनिक, इलेक्ट्रॉनिक्स, लॉजिस्टिक्स, आटी/ फिकटेक/ डेटा सेंटर्स, इव्ही, रिन्यूएबल एनर्जी, ऑईल ॲण्ड गॅस, ॲग्रो ॲण्ड फुड प्रोसेसिंग, टेक्सटाईल इत्यादी क्षेत्रांमधुन गुंतवणूक प्राप्त झाली आहे.

विविध औद्योगिक परिषदा व प्रदर्शने, उद्योग क्षेत्रातील उच्चस्तरीय बैठका, रोड शो व इतर माध्यमांव्दारे गुंतवणूक आकर्षित करण्याचे सतत प्रयत्न सुरू असून त्याव्दारे सातत्याने गुंतवणूक होत आहे.

केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन व अंतर्गत व्यापार विभागाने (DPIIT) २०२३ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार थेट परकिय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे.

मा.मंत्री (उद्योग) यांनी वेदांता, टाटा एअरबस सी २९५, सॅफ्रन व बल्क ड्रग पार्क या प्रकल्पांबाबतचा वस्तुस्थिती अहवाल सन २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर करण्याबाबत निर्देश दिलेले होते. त्याबाबतचा अहवाल विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधीमंडळ सभागृहासमोर सादर करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा खुबगांव (ता. आर्वी, जि. वर्धा) येथील औद्योगीक क्षेत्र (MIDC) स्थापन करण्याबाबत**

**(३५) ६०९९४ (२४-०४-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा खुबगांव (ता. आर्वी, जि. वर्धा) महामार्ग क्र. ३४७/१ या ठिकाणी शासकीय ई-क्लासची जागा १५६.१८ उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजा खुबगांव, ता. आर्वी, जि. वर्धा येथे लागून निम्न वर्धा प्रकल्पाचे पाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून सदर ठिकाणावरून १५ ते २० कि.मी. अंतरावर समृध्दी महामार्ग दळण वळणासाठी उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या परिसरात मोठ्या प्रमाणात पुनर्वसित गावे असल्यामुळे सुशिक्षीत बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मौजा खुबगांव येथे औद्योगिक क्षेत्र (MIDC) स्थापन होण्याबाबत मा. लोकप्रतिनीधीनी मागणी केल्यानुसार शासन औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) मौजे- खुबगांव (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील १५६.०० हे.आर. जमिन ही महसुली रेकॉर्डनुसार झुडपी जंगल असल्यामुळे औद्योगिक क्षेत्राकरीता उपलब्ध होवू शकत नसल्याचे निदर्शनास आले आहे. मौजे. लाडणापूर अडेगाव व लहादेवी (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील प्रस्तावित ११४.३९ हे.आर खाजगी ३४.४६ हे.आर सरकारी असे एकूण १४८.८५ हे.आर.क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करणेच्या प्रस्तावास दि. १२/०५/२०२३ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या १५३ व्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान केलेली आहे. याबाबतची पुढील कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील अंधेरी पूर्व येथील राज्य मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये सेवा सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३६) ६११६४ (२५-०४-२०२३). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अंधेरी पूर्व येथील राज्य मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये सेवा सुविधांचा अभाव असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डिजिटल ग्रंथालयामधील केवळ वाचनालयाचाच उपयोग करता येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रंथालयात बहुतांश कर्मचारी उपस्थित नसल्याने तेथे येणाऱ्या नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मध्यवर्ती ग्रंथालयात उपाययोजना करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१४-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही.

दुर्मिळ ग्रंथ व बालसाहित्य सि.डी.स्वरुपात उपलब्ध असून वाचकांच्या मागणीनुसार सेवा दिली जाते.

(३) हे खरे नाही.

उपकेंद्राकरीता २ पूर्णवेळ कर्मचारी कार्यरत असून उपकेंद्रामध्ये उद्भवलेल्या समस्यांचे तातडीने निराकरण केले जाते.

(४) व (५) उपकेंद्राची इमारत ही बृहन्मुंबई महानगरपालिकेची असून सन २०१८ ते २०२८ या कालावधीची भाडेकराराची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

इमारत दुरुस्तीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवून त्यानुसार इमारत दुरुस्तीचे काम करण्याचे नियोजीत आहे.

---

**राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी शाळा स्थलांतर प्रमाणपत्र (टीसी) अट शिथित केल्याबाबत**

**(३७) ६१२१८ (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोणत्याही माध्यमाच्या शाळेत इयत्ता १ ते १० वीच्या वर्गामध्ये अन्य शाळेतून आलेल्या विद्यार्थ्यांना शाळा स्थलांतर प्रमाणपत्र (टीसी) प्रवेश नाकारला जाणार नसल्याचे शासनाने निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयामुळे राज्यातील कोणत्याही शासकीय, महापालिका, नगरपालिका, खाजगी शाळेत व इतर कोणत्याही शाळेत इयत्ता १ ते १० वीच्या वर्गात प्रवेश हवे असल्यास स्थलांतर प्रमाणपत्र (टीसी) शिवाय प्रवेश दिला जाईल असे निदर्शनास येत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०७-२०२३) :** (१) होय. राज्यातील कोणत्याही माध्यमाच्या शाळेत इयत्ता १ ली ते १० वी च्या वर्गात अन्य शाळेतून विद्यार्थी प्रवेशासाठी मागणी करीत असेल अशा विद्यार्थ्यांना T.C. (Transfer Certificate) अभावी प्रवेश नाकारण्यात येवू नये. याबाबत माध्यमिक शाळा संहितेतील तरतुदीनुसार विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश देवून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, असा निर्णय दिनांक ०६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.
(२) शाळा प्रवेशापासून विद्यार्थी वंचित राहू नये तसेच शिक्षण खंडीत होऊन विद्यार्थी शाळाबाह्य होऊ नये यासाठी सदर शासन निर्णयानुसार राज्यातील कोणत्याही शासकीय, महापालिका, नगरपालिका, खाजगी शाळेत व इतर कोणत्याही शाळेत इयत्ता १ ते १० वीच्या वर्गात प्रवेश हवे असल्यास स्थलांतर प्रमाणपत्र (टीसी) शिवाय प्रवेश दिला जातो.
(३) शाळा प्रवेशापासून विद्यार्थी वंचित राहणार नाही, तसेच शिक्षण खंडीत होऊन विद्यार्थी शाळाबाह्य होऊ नये याची दक्षता संबंधित शाळा प्रमुखांनी / मुख्याध्यापकांनी घ्यावी. असे विद्यार्थी वंचित ठेवल्यास संबंधित शाळेविरूद्ध / मुख्याध्यापका विरूद्ध नियमानुसार / कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट तरतूद सदर शासन निर्णयात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाचा बृहत आराखडा (मास्टर प्लॅन) मंजूर करण्याबाबत**

**(३८) ६१२७७ (२५-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाचा बृहत आराखडा (मास्टर प्लॅन) तयार करण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आराखडयात विद्यापीठाच्या कॅम्पसचे सौंदर्यीकरण, इमारतींचा विकास आणि विदयार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षण पध्दतीनुसार विविध शैक्षणिक सोयीसुविधा विकसित करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर विकास आराखडा मंजूर करुन कार्यवाही करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१५-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. सदर (मास्टर प्लॅन) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विभागामार्फत तयार करण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मुंबई विद्यापीठाचा बृहत आराखडा तयार करण्याचे काममुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून सुरु असून, आराखडा अंतीम झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांना शिक्षकांनी कोंबून आणल्याबाबत**

**(३९) ६१४२७ (२५-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत विभागीय क्रीडा संकुलाच्या मैदानावर प्राथमिक विद्यार्थ्यांचा जिल्हास्तरिय दिनांक ३१ जानेवारी, २०२३ ते दिनांक २ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्रीडा महोत्सवात १ हजार ७३६ शालेय विद्यार्थी सहभागी झाले असता सदर विद्यार्थ्यांना शिक्षकांनी मालवाहतूक ट्रकमधून कोंबून आणल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले आहे हे खरे आहे काय
(३) असल्यास, याबाबत योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. दिपक केसरकर (१२-०७-२०२३) :**(१) होय खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्थलांतरीत मजूर किंवा कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्याबाबत**

**(४०) ६१५७५ (२५-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने केलेल्या सर्वेक्षणात स्थलांतरीत मजूर किंवा कामगारांच्या ७२३ मुलांनी शाळा सोडल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या काळात राज्यात १७,२९७ मुलांनी शाळा सोडल्या असून त्यात मजूरांच्या ७,८०६ मुलांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेऊन या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे ही खरे नाही. माहे नोव्हेंबर ते डिसेंबर २०२२ या कालावधीत हाती घेतलेल्या हंगामी स्थलांतरित कामगारांच्या

मुलांच्या सर्वेक्षणात राज्यात ३ ते १८ वयोगटातील स्थलांतरित होऊन आलेली ११९३४ मुले आढळलेली असून त्यापैकी ११०१४ बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात आले आहे. उर्वरित बालकांना देखील शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करण्यासाठी मिशन झिरो ड्रॉपआऊट दिनांक ०५ जुलै ते २० जुलै, २०२२ या कालावधीत व्यापक स्वरुपात राबविण्याबाबत दिनांक २३ जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले होते.

शिक्षकांनी शाळाबाह्य बालकांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी स्वतःस "बालरक्षक" म्हणून घोषित केले आहे. या बालरक्षकांना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे मार्फत प्रशिक्षण देण्यात येते. या बालरक्षकामार्फत शाळाबाह्य बालकांच्या पालकांचे समुपदेशन करण्यात येऊन कोणतेही बालक शाळाबाह्य राहू नयेत व शाळाबाह्य होऊ नयेत म्हणून यासाठी प्रयत्न केले जातात. पालकांबरोबर स्थलांतरित होणारी बालके शाळाबाह्य होऊ नयेत म्हणून शिक्षण हमी कार्ड दिले जात आहे. जेणेकरून मुले जेथे पालकांसोबत जातील तेथील त्यांचा प्रवेश सुलभ होईल,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरपूर (जि. नंदूरबार) येथील जळोद-अभानपूर येथे राज्यशासनाच्या आदिवासी उपयोजनेतंर्गत पुल बांधणेबाबत**

**(४१) ६१६१६ (२५-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरपूर (ता, जि. नंदूरबार) येथील जळोद-अभानपूर येथे राज्यशासनाच्या आदिवासी उपयोजनेतंर्गत प्रजिमा ४ वरील साखळी किमी ४/५०० मध्ये लहान पुल बांधणे या कामासाठी ६ डिसेंबर, २०१३ ला ४५ लाख रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली असून २९ जानेवारी, २०१५ ला नाशिक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी या कामाचे ६४ लाख ९५ हजार ५३४ लाख रुपयांच्या सुधारित अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता दिली परंतु प्रत्यक्षात पुल बांधलाच गेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची तक्रार दाखल करुन तीन वर्षे झाली असून सदर प्रकरणी संबंधीत अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने संबंधीत दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०७-२०२३) :** (१), (२) व (३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी सदर कामासाठी दि.२९.०१.२०१५ रोजी ₹६४,९५,५३४/- रुपयांच्या सुधारित अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे व अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रक मंडळ, नाशिक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता प्रशासकीय मान्यतेमधील पुलाचे काम न करता प्रशासकीय मान्यता नसलेले परंतु, आवश्यक असलेल्या त्याच रस्त्यावरील दोन लहान पुलांचे व जोड रस्त्याचे काम करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या कामात शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नसून प्रशासकीय अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी संबंधित अधिकारी यांना ताकीद दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पांढरीपूल एमआयडीसीच्या सद्यस्थितीबाबत

**(४२) ६१६६३ (२५-०४-२०२३). श्री.शंकरराव गडाख (नेवासा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरीपुल एमआयडीसीसाठी जमिनी संपादित होऊन २० वर्षानंतरही सर्व प्लॉटचे वाटप पूर्ण झालेले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकुण किती प्लॉटचे वाटप झाले आहे तसेच एकुण किती प्लॉट प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, प्लॉटचे वाटप होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०७-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पांढरीपूल औद्योगिक क्षेत्रासाठी अधिसूचित केलेल्या एकूण ३५२ आरेखित भूखंडांपैकी २५० भूखंडांचे वाटप झालेले असून १०२ भूखंड वाटपास उपलब्ध आहेत.

(३) वाटपासाठी शिल्लक असलेल्या भूखंडामधून मऔवि महामंडळाच्या संकेतस्थळावर ७ भूखंडाकरिता जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेण्यात आल्या असून भूखंड वाटपाबाबतची कार्यवाही मऔवि महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीतील केबल्स तसेच अनधिकृत जाहिरात फलक काढण्याबाबत

**(४३) ६२१५६ (२५-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८, पुणे-सोलापुर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ आणि पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र ६० च्या हद्दीतील केबल्स, वायर्स आणि अनाधिकृत जाहिरात फलक काढून घेण्याचे आवाहन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्यावतीने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दिनांक ३१ जानेवारी २०२३ अखेर एकूण केबल्स, वायर्स आणि अनाधिकृत जाहिरात फलक काढल्याचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२३) :** (१) होय.

(२) सदर राष्ट्रीय महामार्ग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहेत.

राष्ट्रीय महामार्गावरील अनधिकृत जाहिरात फलक, अनधिकृत केबल्स, वायर्स वाहतूकीस अडथळा करणारी अतिक्रमणे, टप-या इ. हटविण्याचे काम हे उद्योजकामार्फत निरंतर चालू असते.

पुणे सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४८, पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ आणि पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.६० च्या हद्दीतील केबल्स, वायर्स आणि अनधिकृत जाहिरात फलक काढून घेण्यात आले होते. त्याचा जानेवारी २०२३ ते एप्रिल २०२३ पर्यंतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| महामार्गाचे नाव | काढलेले अतिक्रमणे | | | |
|---|---|---|---|---|
| | केबल्स / वायर्स संख्या | जाहिरात फलक | बॅनर्स संख्या | इतर अतिक्रमणे संख्या |
| पुणे सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ | १० | ५२४ | २२ | ७२ |
| पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ | ०४ | ४४७ | २५५ | ४९७ |
| पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.६० | ०५ | ५४ | ०४ | ०९ |

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे लाभार्थ्यांना मोफत धान्य मिळत नसल्याबाबत

**(४४) ६२४२० (२४-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अन्नपुरवठा अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे गरिब गरजू लाभार्थ्यांना अंत्योदय योजनेतंर्गत मोफत धान्य मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अन्नपुरवठा अधिकाऱ्यांवर कारवाई करणे तसेच अंत्योदय योजनेअंतर्गत गरजू गरीब लाभार्थ्यांना मोफत धान्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१३-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

कोरपना तालुक्यातील अंत्योदय अन्न योजनेतील पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत मोफत अन्नधान्याचे वितरण माहे डिसेंबर,२०२२ पर्यंत पूर्ण करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना माहे जानेवारी,२०२३ मध्ये ९६% अन्नधान्याचे वितरण करण्यात आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे- सातारा महामार्गाच्या प्रलंबित कामांबाबत

**(४५) ६२५७० (२५-०४-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सातारा महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने तसेच महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम गत दहा वर्षापासून प्रलंबित असल्याने अनेक दुर्घटना घडत असूनही याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या महामार्गाची सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२३) :** (१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अखत्यारीत येते.

सदर महामार्गाच्या सहापदरीकरण करणेच्या कामासाठी सवलत करारानुसार प्रकल्प पूर्ण करण्याची नियोजित तारीख माहे मार्च २०१३ होती.

जमीन हस्तांतरित करण्यास विलंब, सेवा वाहिन्या स्थलांतरण, महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे काढणे, धार्मिक स्थळांचे स्थलांतरण इ. कारणांमुळे सदर काम हे नियोजित कालावधीत पूर्ण करता आले नाही.

रस्त्यावरील सर्व खड्डे भरण्यात आले असून रस्ता वाहतूकीसाठी सुस्थीतीत ठेवण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत पुणे सातारा महामार्गाचे बहुतांशी काम पूर्ण झाले आहे.

अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), मुंबई यांचे अहवालानुसार सदरचे अपघात हे रोडवरील खड्डयांमुळे अगर प्रलंबित कामांमुळे झालेले नसुन वाहन चालकांच्या चुकीमुळे तसेच भरधाव वेगात,रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने झालेले आहेत.

(२) व (३) पुणे सातारा महामार्गाच्या एकूण १३७.६६ कि.मी. लांबीपैकी २.६९ कि.मी. लांबीमध्ये शिंदेवाडी, जि.सातारा, किकवी, ता.भोर, जि.पुणे, खेड शिवापूर, जि.पुणे या ठिकाणी स्थानिक लोकांनी मंजूर निविदेतील उड्डाणपूल/भूयारी मार्गाचे ठिकाण व रुंदी यामध्ये बदल करण्याची मागणी केली असल्याने या ठिकाणी कामे अपूर्ण आहेत.

सद्यस्थितीत सदर प्रलंबित कामास मंजुरी मिळाली असून निविदा प्रक्रिया सुरु आहे.

---

## नागपूर आणि मुंबई येथील राष्ट्रीय विधी विद्यपिठासह देशातील विधी विद्यापीठांमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांना अखिल भारतीय कोटयातून प्रवेश मिळत नसल्याबाबत

**(४६) ६२५८३ (३०-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कायद्याचे शिक्षण देण्यासाठी स्थापन केलेल्या नागपूर आणि मुंबई येथील राष्ट्रीय विधी विद्यापिठासह देशातील विधी विद्यापीठांमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांना अखिल भारतीय कोटयातून प्रवेश मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने कायद्याचे शिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय विधी विद्यापीठांची स्थापना केली त्यांचे संचालन बार कौन्सिल ऑफ इंडियाद्वारे केले जाते देशात २३ विधी विद्यापीठांचा समावेश आहे यात देशभरातील कुठलाही विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो असे नमूद आहे त्यामुळे विधी विद्यापीठामध्ये अखिल भारतीय कोटा असणे आवश्यक आहे त्यानुसार या कोटयात प्रवेश घेण्यासाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी शाखाप्रमाणे आरक्षणाचे नियम पाळणे आवश्यक आहे तरीही नागपूर आणि मुंबईसह देशातील १८ विधी विद्यापीठांमध्ये या आरक्षणानुसार इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत नसल्याने देशभरातील ओबीसी विद्यार्थ्यांवर मोठया प्रमाणावर अन्याय होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ओबीसी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१४-०७-२०२३) :** (१)हे खरे नाही;

(२) हे खरे नाही;

राज्यात राष्ट्रीय विधी विद्यापीठ अधिनियम, २०१४ अन्वये राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई, राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागपूर व राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद या तीन विधी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली आहे. या विद्यापीठाच्या

अधिनियमातील आरक्षणाच्या तरतुदीनुसार तसेच राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या धोरणानुसार ओबीसी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडचिरोली जिल्ह्यामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र मंजूर करणेबाबत

**(४७) ६२६१० (२६-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयामध्ये प्रशासकीय सेवेत जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हयात एकही स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र नसल्यामुळे विद्यार्थ्यांना नागपूर,पुणे,मुंबई सारख्या शहरांमध्ये जाऊन स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन घ्यावे लागत हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर जिल्हयातील विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थीती हालाखीची असल्यामुळे मोठया शहरांमध्ये जाऊन स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन घेणे त्यांना परवडत नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर्थिक परिस्थिती हालाखीची असलेल्या विद्यार्थ्यांकरीता गडचिरोली जिल्हयामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२७-०६-२०२३) :** (१), (२) व (३) राज्यात राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्र कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर येथे विभागीय स्तरावर कार्यरत असून अन्य जिल्हयांच्या ठिकाणी नाहीत. तथापि जिल्हानिहाय स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शिवाजी विद्यापीठांतर्गत विधी अभ्यासक्रम प्रथम वर्ष सत्र दोनची परिक्षेच्या निकालाबाबत

**(४८) ६३०३१ (२६-०४-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजी विद्यापीठांतर्गत विधी अभ्यासक्रम प्रथम वर्ष सत्र-दोन ची परिक्षा दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास झाली असून दिनांक २१ डिसेंबर,२०२२ रोजी निकाल जाहिर केला असतांना अनेक विधी महाविद्यालयांचा निकाल पात्रतेअभावी राखून ठेवण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुढील शैक्षणिक वर्ष अद्यापही सुरु झाले नसल्याने तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१४-०७-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे.
शिवाजी विद्यापीठा अंतर्गत १. इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा २.एन. एस.सोटी लॉ कॉलेज,सांगली ३.न्यू लॉ कॉलेज, सांगली आणि ४.यशंवतराव चव्हाण लॉ कॉलेज, सातारा या महाविद्यालयांमधील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विधी तीन व पाच वर्षिय अभ्यासक्रमासाठी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची मान्यताप्राप्त यादी प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून प्राप्त झाली नसल्याने या विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेऊन दि.२१.०५.२०२३ ते दि.३०.०५.२०२३ या कालावधीत निकाल देण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.
शैक्षणिक वर्ष नियमित सुरू करण्यात आले असुन कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यमार्ग क्र. २१ सप्तश्रृंगीगड-नांदुरी-अभोणा-कनाशी-आलियाबाद (ता.कळवण, जि.नाशिक) रस्त्याच्या कामास एमआरआयपी अेडीबी योजनेंतर्गत मंजुरी मिळणेबाबत**

**(४९) ६३२१६ (२५-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यमार्ग क्र. २१ सप्तश्रृंगीगड-नांदुरी-अभोणा-कनाशी-आलियाबाद रस्ता कि.मी. ०/०० ते ५२/०० (ता.कळवण, जि.नाशिक) महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्प (MRIP) ADB अर्थ सहाय्य पॅकेज अंतर्गत या रस्त्याच्या कामास मंजुरी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी तत्कालीन मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व मा.राज्यमंत्री यांच्याकडे दि. २८/०१/२०२०, ८/६/२०२०, २६/१०/२०२०, २/११/२०२०, २/१/२०२१ रोजी निवेदनाव्दारे मागणी केली आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी तालुक्यातील साडेतीन शक्तीपीठापैकी एक असलेले श्री सप्तश्रृंगी गड या शक्तीपीठ तीर्थक्षेत्राला जोडणारा महत्वाचा रस्ता असल्याने सदर रस्ता मंजुर होणे अत्यंत आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या मंजुरीसह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०५-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) सदर रस्त्यावर कि.मी. २५/२५० ते ३३/०० एकूण ८.२५ कि.मी. इतक्या लांबीत रस्त्याची सुधारणा करण्याचे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम लवकरच हाती घेण्याचे नियोजन राहील.
तसेच उर्वरीत काम आशियाई विकास बँकेच्या निकषांच्या तपासणीनंतर प्रकल्पांतर्गत समाविष्ट झाल्यास, हाती घेण्याचे नियोजन राहील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा सावळापुर (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील औद्योगीक क्षेत्र (MIDC) क्षेत्र स्थापन करण्याबाबत**

**(५०) ६३९१७ (२७-०४-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा सावळापुर (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील शासनाच्या जागेवर औद्योगीक विभागामार्फत औद्योगीक क्षेत्र (MIDC) स्थापन करण्याची मागणी लोकप्रतीनीधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्वी विधानसभा क्षेत्रामध्ये कोणतेही उद्योग नसल्यामुळे बेरोजगाराची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्याच्यादृष्टीने मौजा सावळापुर येथे औद्योगीक क्षेत्र (MIDC) स्थापन करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मौजे सावळापुर नजिकची मौजे लाडणापूर, अडेगाव व लहादेवी (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील प्रस्तावित ११४.३९ हे.आर खाजगी ३४.४६ हे.आर सरकारी असे एकूण १४८.८५ हे.आर.क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करणेच्या प्रस्तावास दि. १२/०५/२०२३ रोजीच्या

उच्चाधिकार समितीच्या १५३ व्या बैठकीमध्ये मान्यता प्रदान केलेली आहे. याबाबतची पुढील कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.